## उलट्या बोंबा

कुणी तरी मारत असतो
जगात उलट्या बोंबा,
वठणीवर आणतो यांना
थोडे दिवस थांबा...

वेडे आहेत लोक आमचे
आवडतो यांना आश्वासन,
शहाणे आहेत नेते आमचे
प्रिय त्यांना सिंहासन...

मी पण आहे एक नेता
मारत नाही खोट्या बाता,
शब्द दिलेला पाळत असतो
स्वप्न पूर्ण करता करता...

शैली माझी आहे न्यारी
देश माझा जगात भारी,
विकास आणि प्रगती सोबत
घेणार आहे उंच भरारी...

कुणी तरी मारत असतो
जनतेत उलट्या बोंबा,
जमिनीवर आणतो यांना
थोडे दिवस थांबा...

**मुबारक शेखजी**
सोलापूर

१
मी टेरेसवर
वर रणरणतं ऊन
खाली तापलेली
सणसणीत चटके देणारी फरशी
या सगळ्याचा परिपाक
डोक्यावरच्या वीजेच्या तारेवर
वाकड्या मानेचे कावळे
सूर्याची प्रछन्न ह्यटायी
एकवेळ
मी मी म्हणणारी माणसं
चिडीचूप्प राहतात
पण कावळे त्यांचा गुणधर्म सोडत नाहीत
उपजत कर्णकर्कश्श आवाजाचा
माणसं एकमेकांना
कमीजास्त तुच्छ लेखत
समाजाचं अपरिहार्य अस्तित्व
एकत्रित मान्य करतात
कावळे उडतानाच काय
पण शिटताना सुद्धा
उंच मान करून
एकमेकांपासून
एकमेकांशी
खोलवर दूर असतात
२
रस्त्यावरून
बिल्डिंगच्या टेरेसवरचं
फक्त डोकं दिसलं
अन् एकदम
बिल्डिंगच्या दिशेनं
आकाशातून
घारीनं मारलेला सूर
पुढचा सगळा इतिहास
तुम्हाला ठाऊकच आहे

**अरुणचंद्र गवळी**
पुणे